वर्ष-०७ | अंक-२१ | मुंबई, मंगळवार १३ ते १९ एप्रिल २०२१ | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

• संपादक : दिपक मोरेश्वर नाईक • कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक • सह संपादक : सौ. अश्विनी नाईक परब

PG 2 भयंकर! ३ कोटी रुपयांसाठी तिने पतीला कारसह पेटवले

3 → घरापर्यंत पाठलाग केला; तिचा नवरा घराबाहेर पडताच 'तो' बेडरुममध्ये घुसला अन्

दागिने चोरी करणाऱ्या महिलेला वसई पोलीसांनी केली अटक ; 9 तोळे दागिने हस्तगत ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## चिंताजनक! मुंबईत आतापर्यंत 101 पोलीस कर्मचाऱ्यांचा कोरोनामुळे बळी



देशभरात कोरोनाने पुन्हा एकदा थैमान घालण्यास सुरुवात केली आहे. राज्यासह मुंबईत कोरोनाबाधितांच्या आकडेवारीत दिवसागणिक वाढ होत आहे. तसेच कोरोनाने बळी जाणाऱ्यांचा आकडा देखील वाढत आहे. आता कोरोनाचा विळखा पोलीस दलाला ...पान २ वर...

## मुंबईकरांना बेड मिळून देण्यासाठी आता कठोर पावलं टाकणार -महापौर



देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतील स्थिती करोनामुळे गंभीर बनली आहे. दिवसाला दहा हजारांच्या ...पान २ वर...




# असा साजरा करा यंदाचा गुढी पाडवा, सरकारने जाहीर केली नियमावली

मुंबई - मराठी माणसांचा नववर्ष दिन म्हणजे गुढी पाडवा. उद्या गुढीपाडवा अर्थात हिंदू नव वर्षाचा पहिला दिवस साजरा होत आहे. हा दिवस आपण गुढी उभारून साजरा करतो. घरात पुरणाची पोळी, नवनवीन वस्तूंची खरेदी आणि आनंदाचे वातावरण असते. मात्र, यंदाच्या गुढी पाडव्यावर कोरोनाचं सावट आहे. राज्यातील कोरोना रुणांची संख्या लक्षात घेता सरकारने गुढी पाडवा कसा साजरा करावा, याबद्दल नियमावली जाहीर केली आहे. राज्य सरकारने राज्यात 30 एप्रिलपर्यंत कडक निर्बंध लादले आहेत. त्या, पार्श्वभूमीवर बाजारपेठेतील





अत्यावश्यक सेवा वगळता सर्वच दुकाने बंद आहेत. त्यामुळे, कोरोनाचं सावट यंदाच्या गुढी पाडव्याच्या सणावरही आहे. त्यासाठीच, सरकारने गुढी पाडवा साजरा करण्यासाठी नियमावली जाहीर केली आहे. त्यानुसार, कुठलिही मिरवणूक काढण्यास बंदी घालण्यात आली असून घरीच हा सण साजरा करण्याचे आवाहनही करण्यात आलंय. नागरिकांनी सकाळी 7 वाजल्यापासून संध्याकाळी 8 वाजण्यापूर्वीच गुढी पाडवा साजरा करावा. अनेक ठिकाणी पारंपरिक पद्धतीने हा सण साजरा होतो. विशेष म्हणजे पालखी, दिंडी, प्रभार फेरी, बाईक रॅली व मिरवणूक काढण्यात येतात. मात्र, यंदाच्या वर्षी या सर्वांनाच बंदी घालण्यात ...पान २ वर...

## वेश्या व्यवसाय करणाऱ्या दलालावर पोलीसांची कारवाई; 04 पीडित मुलींची केली सुटका



अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईदर यांनी वेश्या व्यवसायिक पुरुष दलालावर कारवाई करून ०४ पिडित मुलींची सुटका केली . दिनांक ०३.०४.२०२१ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. एस.एस.पाटील यांना गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की,नवघर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जय जलाराम काठीयावाडी धाबा, गोल्डन नेस्ट रोड, भाईन्दर पूर्व या ठिकाणी पुरुष वेश्यादलाल पुरुष ग्राहकांना वेश्यागमनासाठी मुली पुरविणार आहे. त्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. एस.एस.पाटील यांनी पथकासह जय जलाराम काठीयावाडी ढाबा, गोल्डन नेस्ट रोड, भाईन्दर पूर्व या ठिकाणी कारवाई केली.सदर छापा कारवाईत वेश्या दलाल राजा उर्फ सरवर अख्तर हुसेन वय ४५ वर्षे राहायला भिवंडी, ता.जि.ठाणे. हा वेश्यागमनासाठी ग्राहकांकडुन पैसेस्वीकारुन त्या मोबदल्यात मुली पुरवित असल्याचे निष्पन्न झाले. त्यास वेश्यगमनाकरीता स्विकारलेल्या रक्कमेसह ताब्यात घेवुन ०४ पिडित मुलींची सुटका करण्यात आली.सदर बाबत अटक आरोपी यांच्या विरुध्द नवघर पोलीस ठाणे येथे पोलीस हवालदार./ ...पान २ वर...

## रायगड राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक 2 ची उल्लेखनीय कामगिरी




बोरघर / माणगांव ( विश्वास गायकवाड ) निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र.2. पनवेल यांना माहिती मिळाल्यानंतर त्या पथकांनी दि.07 एप्रिल रोजी पनवेल तालुक्यातील मौजे निलकंठ स्वीट समोर, सेक्टर 20, खारघर, येथे गोवा राज्य निर्मित विदेशी मद्याच्या वाहतुकीवर पाळत ठेवून छापा घातला. या छाप्यात एम.एच.46 ए.एल 4453 या पांढऱ्या रंगाच्या मारुती सुझुकी इरटिगा कंपनीच्या कारमधून गोवा निर्मित विदेशी मद्याच्या 36x750 मिलिलीटर क्षमतेच्या, 12 हजार 375 मिलिलीटर क्षमतेच्या, 1 लाख 94 हजार 180 मिलिलीटर क्षमतेच्या 45 लाख 64 हजार 500 मिलिलीटर क्षमतेचे स्ट्रॉंग बिअरचे सीलबंद कॅन व एक ॲपल कंपनीचा 45 आयफोन मोबाईल सिमकार्ड सहीत 1) मुलावरअली रोजनअली शेख, वय 46 वर्षे रा. रुम नं.1001, केसेंट हायलाईट, सेक्टर 35 डी, प्लॉट नंबर 4, खारघर, ता. पनवेल, जि. रायगड. 2) वाजिद नूर सय्यद, वय 24 वर्षे रा. बिरोबा रोड, कालिकानगर, डॉ. वपे हॉस्पिटल, मु/ पो. शिर्डी, ता. राहता, जि. अहमदनगर, 3) साईनाथ श्रीमंत पटाले, वय 29 वर्षे रा. बिरोबा रोड, कालिका नगर, डॉ. वपे हॉस्पिटल, मु./पो. शिर्डी, ता.राहता, जि. अहमदनगर. या तिन्ही आरोपीस अटक करुन ...पान २ वर...

## कोवीड-19 नियमावलीचे उल्लघन करणाऱ्या तीन हॉटेल्स वर नवघर पोलीसांची धडक

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार दि. ०३.०४.२०२१ रोजी , नवघर पोलीस ठाणे हदित असलेले प्राईम बार अँड रेस्टॉरंट, नटराज बार ॲण्ड रेस्टॉरंट व एम.जी.कंट्रीबार या आस्थापनाचे चालक, मालक हे कोरोना विषाणुमुळे (कोवीड-१९) च्या वाढत्या प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघन करुन आप-आपल्या आस्थापना मध्ये गर्दी जमवुन शासनाच्या आदेशाचा भंग करुन आस्थापना चालु ठेवलेल्या खाद्य पदार्थ इत्यादी विक्री करीत आहेत



अशी माहिती मिळाल्याने नवघर पोलीस ठाण्याचे पोलीस पथकाने नमुद आस्थापनावर छापा कारवाई केलेली आहे१) प्राईम बार ॲण्ड रेस्टॉरंट, नवघर फाटक रोड,भाईदर पुर्व येथे आलेल्या ग्राहकांनी शासनाने ठरवुन दिलेल्या नियम,अटी शर्तीचे तसेच सोशल डिसटन्स चे पालन न करता विनामास्क गर्दी जमविलेल्या ८ इसमांविरुध्द नवघर पोलीस ठाण येथे गुन्हा रजि. नं. : २६१/२०२१ भा.दं.वि.सं.कलम १८८, २६९,२७०,२७१,२९० सह महाराष्ट्र कोवीड उपाय ...पान २ वर...




## किरकोळ वादातून जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने केलेला हल्ला, 07 आरोपी अटक



कोपरखैरणे येथे ३१/०३/२०२१ रोजी काही आरोपीवर फिर्यादी यांचे नातेवाईकासोबत किरकोळ कारणावरून वाद घालून त्याना मारहाण केली होती. त्याबाबत फिर्यादी मांचा भाऊ यांनी विचारणा केली असता त्याचा राग मनात भरून आरोपीवर फिर्यादी यांचे भावास जाब विचारले असता त्यास धारदार शस्त्राने वार करून माखन फिर्यादीचा भाऊ बचावाकरीता पळाल्याने त्याचा पाठलाग करून त्याचे गळयातील चैन खेचून धारदार शस्त्राने वार केला असता जीवे ठार मारण्याच्या प्रयल केला होता. या पटनेवरून कोपरखैरणे पोलीस ठाणे येथे गु.र.नं.८७/२०२१. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.या गुन्हयाच्या तपासकामी तात्काळ मा. पो. उप. आ. श्री. सुरेश यांच्या मार्गदर्शनाखाली, स.पो.आ. श्री. विनायक वस्त यांच्या अधिपत्याखाली तपास पथक तयार करून ...पान २ वर...

पोलीस बातमी पत्र

मुंबई

२

मुंबई, १३ ते १९ एप्रिल २०२१


# माथाडींच्या पैशावर डल्ला; पोलिसात गुन्हा दाखल



ओझे उचलून घाम गाळून पैसा कमविणाऱ्या माथाडी कामगारांच्या बँकेतील जमा पुंजीवर डल्ला टाकण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. रेल्वे गुड्स क्लीअरिंग अँड फॉरवर्डिंग एस्टॅब्लिशमेंट लेबर बोर्ड, मुंबई या मंडळाच्या बँक ऑफ बडोदामधील बचत खात्यामधून ५ कोटी ६ लाख इतकी रक्कम काढण्यात आली आहे.

ही रक्कम काढण्यासाठी बनावट चेक वापरून त्यावर पदाधिकाऱ्यांच्या खोट्या सह्या करण्यात आल्या आहेत. सहायक कामगार आयुक्तांच्या तक्रारीनंतर माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाने माथाडी कामगार, हमाल आणि इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ संमत करून त्या अंतर्गत असलेली रेल्वे गुडस क्लीअरिंग अँड फॉरवर्डिंग असंरक्षित कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना १९७६ मधील तरतुदी मुंबई, ठाणे व रायगड आणि पालघर जिल्ह्यातील विविध रेल्वे यार्ड्स व गुड्स शेड्स या ठिकाणी लागू केले आहेत. या योजने अंतर्गत असंरक्षित श्रमजीवी कामगारांच्या नोकरीचे नियमन करणे, त्यांच्या नोकरीच्या सेवा निश्चित करणे तसेच त्यांच्या आरोग्य व कल्याणासाठी व इतर सुरक्षिततेच्या उपायासाठी तरतूद करणे, कामगारांच्या श्रमाचा पुरेसा व यथोचित पुरवठा करणे इत्यादीबाबत अधिनियम व योजनेतील तरतुदींच्या अंमलबजावणी व प्रयोजनासाठी रेल्वे गुड्स क्लीअरिंग अँड फॉरवर्डिंग एस्टॅब्लिशमेंट लेबर बोर्ड, मुंबई या मंडळाची निर्मिती करण्यात आली आहे. माथाडी कामगारांच्या भविष्य निधीचे पैसे जमा करण्यासाठी मंडळाने बँक ऑफ बडोदामध्ये बचत खाते उघडले आहे.

कामगार कल्याण मंडळाच्या सहायक कामगार आयुक्तांकडे फेब्रुवारी २०२१ मध्ये या माथाडी मंडळाचा अध्यक्ष म्हणून अतिरिक्त कार्यभार देण्यात आला.

# भयंकर! ३ कोटी रुपयांसाठी तिने पतीला कारसह पेटवले

तामिळनाडू: तामिळनाडूतील इरोड जिल्ह्यात पती-पत्नीच्या नात्याला काळिमा फासणारी घटना उघडकीस आली आहे. तीन कोटी रुपयांची विम्याची रक्कम मिळवण्यासाठी तिने आपल्या काकाच्या मुलाच्या मदतीने पतीची हत्या केली. पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी अपघात असल्याचे भासवले.

मिळालेल्या माहितीनुसार, इरोड जिल्ह्यातील पेरुन्दुरई येथील ६२ वर्षीय रंगराजन यांच्या पत्नीने विम्याचे पैसे मिळवण्यासाठी त्यांची हत्या केली. यासाठी तिच्या काकाच्या मुलाने मदत केली. रंगराजन हे पावर लूम आणि रिअल इस्टेटचा व्यवसाय करत होते. अलीकडेच त्यांना एक अपघात झाला होता. त्यात ते जखमी झाले होते. कोईम्बतूरमध्ये एका खासगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते.



रंगराजन यांना रुग्णालयातून सोडण्यात आल्यानंतर त्यांची ५५ वर्षीय पत्नी ज्योती मणी आणि तिच्या काकाचा मुलगा राजा (वय ४१) हे त्यांना व्हॅनमधून घरी घेऊन जात होते. दोघांनी आधीच त्यांच्या हत्येचा कट रचला होता. व्हॅनमधून जाताना पेरुमानल्लूरजवळ आग लागली.

आम्ही कसाबसा जीव वाचवला. रंगराजन हे बाहेर पडू शकले नाहीत, असा बनाव रचला. काही प्रत्यक्षदर्शींनाही त्यांनी हेच सांगितले. पोलिसांनी या घटनेची चौकशी केली. रंगराजन यांची पत्नी आणि तिचा चुलत भाऊ यांचे जबाब संशयास्पद वाटले. दोघांनीही वेगवेगळी माहिती दिली. त्यामुळे पोलिसांना त्यांच्यावर संशय आला. त्यांची कसून चौकशी केली असता, त्यांनी खळबळजनक माहिती दिली.

पती रंगराजन यांनी तीन कोटी रुपयांचा विमा उतरवला होता. त्यांच्यावर एक कोटी रुपयांचे कर्ज होते. ज्यांच्याकडून पैसे घेतले होते, ते पैशांची मागणी करत होते. तिच्या पतीने विम्याच्या रकमेत तिलाच वारसदार ठेवले होते. पत्नी ज्योती आणि राजा यांनी सांगितले की, रंगराजन यांनीच हत्या करण्यास सांगितले होते आणि विम्याच्या रकमेतून कर्ज फेडण्यास सांगितले होते. त्यानंतर दोघांनीही हत्येचा कट रचला होता. रंगराजन यांच्यावर पेट्रोल ओतून पेटवून दिले. ही दुर्घटना असल्याचे भासवले. विम्याची रक्कम मिळवण्यासाठीच हत्या केल्याची कबुली दोघांनी दिली. पोलिसांनी हत्येप्रकरणी दोघांना अटक केली आहे.

# तहसीलदारासह सहायक जाळ्यात



औरंगाबाद : शेतकऱ्याकडून ७० हजाराची लाच स्वीकारणाऱ्या गंगापूरमधील तहसीलदार अविनाश महादेव शिंगटे आणि महसूल सहायक अशोक बाबुराव मरकड (५५) यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शुक्रवारी रंगेहाथ पकडले. वडिलोपार्जित जमिनीच्या सातबाऱ्यावरील कूळ कायद्याप्रमाणे बेकायदेशीर शेरा कमी करुन व्यवहार करण्यासाठी ही लाच मागितल्याचा आरोप आहे.

आपेगावातील (ता. गंगापूर) शेतकऱ्याची जमीन, गट क्रमांक १९ मध्ये आहे. तिचा बेकायदेशीर शेरा कमी करुन व्यवहार करण्यासाठी दोघांनी एक लाख २५ हजाराच्या लाचेची मागणी केली होती. त्या विरोधात शेतकऱ्याने तक्रार दिली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने लाचेचा पहिला हप्ता म्हणून दोघांनी ७० हजारांची लाच स्वीकारल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक डॉ. राहुल खाडे, अप्पर पोलिस अधीक्षक डॉ. अनिता जमादार, उपअधीक्षक ब्रम्हदेव गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपअधीक्षक मारुती पंडित, निरीक्षक विकास घनवट, पोलिस नाईक प्रकाश घुमरे, भूषण देसाई, शिपाई मिलिंद इप्पर यांनी केली.

# धक्कादायक ! गाद्या भरण्यासाठी कापसाऐवजी वापरलेल्या मास्कचा वापर



कुसुंबा गावातील ग्रामस्थांच्या हा प्रकार लक्षात आल्यानतंर त्यांनी दिलेल्या माहीतीनंतर पोलिसांनी घटनास्थळी येत गादी भंडारचालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

अमजद अहमद मन्सुरी (वय ३८, रा. आझादनगर) याचे कुंसुबा नाका परिसरात महाराष्ट्र गादी भंडार सेंटर नावाचे दुकान आहे. या दुकानाच्या बाहेर मोठ्या प्रमाणात वापरलेल्या मास्कचा ढीगारा होता. कुसुंब्याचे पोलीस पाटील राधेशाम चौधरी, उपसरपंच विलास कोळी यांच्या निदर्शनास हा प्रकार आला. त्यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सिद्धेश्वर डापकर व शांताराम पाटील यांना ही माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली. गादी भंडारच्याा बाहेर मोठ्या प्रमाणात वापरलेल्या मास्कचा ढिगारा आढळून आला.

अमजद याला विचारणा केली असता त्याने पोलिसांना उडवाउडवीची उत्तरे दिली. मास्क कोठून आणले? याचीही माहिती त्याने दिली नाही.

आपण रुग्णालयात दाखल होतो. मास्क कोणी आणले हे माहीत नसल्याचे तो पोलिसांना सांगता होता. या प्रकरणी डापकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अमजद याच्या विरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# डॉक्टर आहे की हैवान! प्रेयसीची हत्या करुन क्लिनिकच्या बाजूलाच पुरला मृतदेह

सतना: मध्य प्रदेशातील सतना जिल्ह्यात एका डॉक्टरने आपल्या प्रेयसीची हत्या केल्याचे उघड झाले आहे. क्लिनिकमध्ये काम करणाऱ्या तरुणीला आधी या डॉक्टरने प्रेमाच्या जाळ्यात ओढले. त्यानंतर तिने लग्नासाठी तगादा लावला. त्यावर तो चिडला आणि त्याने तिची गळा आवळून हत्या केली. क्लिनिकजवळ असलेल्या गल्लीतच खड्डा खोदून तिचा मृतदेह पुरला.



डॉक्टरच्या क्लिनिकमध्ये काम करणारी तरुणी विभा केवट ही १४ डिसेंबर २०२० नंतर बेपत्ता झाली. तरुणीच्या बाबत तिच्या कुटुंबीयांनी डॉक्टरकडे वारंवार विचारणा केली. त्यावेळी ती कामानिमित्त बाहेर गेल्याचे त्याने सांगितले. त्यानंतर त्यांनी पोलीस ठाण्यात विभा बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली. तक्रार नोंदवल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. डॉक्टरकडे चौकशी केली असता, या घटनेचा उलगडा झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, धावरी परिसरातील डॉक्टर आशुतोष त्रिपाठी याच्या क्लिनिकमध्ये काम करणारी विभा केवट १४ डिसेंबर २०२० रोजी बेपत्ता झाली होती. त्या दिवशी रात्री तरुणी घरी पोहोचली नाही म्हणून कुटुंबीय दुसऱ्या दिवशी क्लिनिकवर पोहोचले. त्यांनी डॉक्टरकडे विचारणा केली. त्यावर ती काही कामानिमित्त बाहेर गेल्याचे सांगितले. बरेच दिवस उलटून गेले. पण ती परतली नाही. कुटुंबीयांनी डॉक्टरकडे विचारणा केली. पण त्याने थातुरमातुर उत्तरे देऊन टाळाटाळ केली. बरेच दिवस तरुणीचा काहीच ठावठिकाणा लागत नाही म्हणून त्यांनी अखेर पोलिसांत तक्रार दाखल केली.

# हल्दीराम कंपनीतील श्रमिकाची आत्महत्या




कापसी येथील हल्दीराम कंपनीतील श्रमिकाने दुपट्ट्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना कळमन्यातील मिनी मातानगर येथे रविवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास उघडकीस आली. लोकेश पतीराम पोरकडे (वय २९), असे मृताचे नाव आहे. त्याच्या आत्महत्येमागील कारण कळू शकले नाही. कळमना पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

# रिझर्व्ह बँकेची इमारत उडविण्याची धमकी

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे दक्षिण मुंबईतील मुख्यालय बॉम्बने उडवून देण्याची धमकी देणारा एक ई-मेल आला आहे. आयएसच्या नावाने आलेल्या या ई-मेलनंतर 'आरबीआय'च्या सुरक्षेत वाढ करण्यात आली असून याप्रकरणी माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फोर्ट येथील आरबीआय अमर भवन इमारतीमध्ये अनेक विभाग आहेत. यापैकी डिपार्टमेंट आफ करंन्सी मॅनेजमेंट या विभागात ८ एप्रिल रोजी दुपारी तीनच्या सुमारास webmaster@rbi.org.in या मेलआयडीवर एक धमकीचा मेल आला. या मेलमध्ये आयएस या दहशतवादी संघटनेच्या नावाचा उल्लेख करून मी दहशतवादी असून उद्या तुमची बँक बॉम्बने उडवून देणार, असे यात नमूद करण्यात आले होते. या मेलची गंभीर दखल घेत या विभागातील अधिकाऱ्यांनी ही बाब सुरक्षा विभागातील अधिकाऱ्यांच्या लक्षात आणून दिली. या मेलनंतर इमारतीची सुरक्षा अधिक कडक करतानाच सुरक्षा अधिकाऱ्यांनी याबाबतची




माहिती पोलिसांना दिली. सुरक्षा अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीवरून माता रमाबाई आंबेडकर मार्ग पोलिसांनी गुन्हा दाखल केला. कुणीतरी खोडसाळपणा केल्याचे वाटत असले तरी तांत्रिक पुराव्यांवरून हा मेल नेमका आला कुठून याचा शोध पोलिस घेत आहेत.

## पृष्ठ १ वरुन

### चिंताजनक! मुंबईत आतापर्यंत 101

देखील बसत असून मुंबईतल्या एका पोलीस अधिकाऱ्यांचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे. वाकोला पोलीस स्टेशनमधील पोलीस उपनिरीक्षक यांचे कोरोनामुळे निधन झाले आहे. ते ५४ वर्षांचे होते त्यांच्यावर वांद्रे येथील जम्बो कोविड सेंटरवर उपचार सुरु होते. मात्र, उपचारा दरम्यान, त्यांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. तर आतापर्यंत मुंबईत १०१ जणांचा कोरोनामुळे मृत्यू झाल्याची चिंताजनक बाब समोर आली आहे.

### मुंबईकरांना बेड मिळून

सरासरीने रुग्ण आढळून येत असल्यानं बेड मिळवताना रुग्णांच्या नातेवाईकांची दमछाक होत आहे. अनेकजण बेड अडवून ठेवत असल्याचंही महापालिकेच्या पाहणीतून समोर आलं असून, आता सर्वसामान्य रुग्णांना बेड मिळवून देण्यासाठी कठोर कार्य पद्धती मुंबई महापालिकेकडून अवलंबली जाणार आहे. महापौर किशोर पेडणेकर यांनी याबद्दलची माहिती दिली. मुंबईत करोना रुग्णांना बेड मिळत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. त्यामुळे महापालिकेकडून कृती कार्यक्रम तयार केला जात असून, याबद्दलची माहिती महापौर किशोरी पेडणेकर यांनी दिली. त्या पत्रकारांशी बोलत होत्या. महापौर म्हणाल्या, "मुंबईतील कोविड रुग्णांना योग्य बेड मिळण्यासाठी महापालिकेनं कठोर पावलं उचलली आहेत. कठोर कार्य पद्धती अमलात आणली जाणार आहे. आता प्रत्येक वार्डसाठी दोन नोडल अधिकारी असतील. हे अधिकारी दुपारी ३ ते रात्री ११ आणि रात्री ११ ते ७ या वेळेत ते काम पाहणार आहे. त्यामुळे सायंकाळी ७ वाजेपासून ते सकाळी ७ वाजेपर्यंत रुग्णांना बेडसाठी जी वणवण करावी लागते. योग्य व्यक्तींकडून मार्गदर्शन मिळतं नाही. १९१६ वर कॉल करतात. मात्र, अनेकांना फोन व्यस्त सांगतो, त्यामुळे मुंबईकरांनी प्रत्येक वॉर्डमधील वॉररुममध्येच फोन करावा. जेणेकरून वॉररुम आणि नोडल अधिकारी बेड मिळवून देण्यासाठी मदत करतील," असं आवाहन महापौर किशोरी पेडणेकर यांनी केलं आहे. "२४ तासांच्या आत रिपोर्ट देण्याचे महापालिकेनं प्रयोगशाळांना सांगितलं आहे. जेणेकरून लगेच त्यांच्यावर औषधोपचार करता येतील. तसंच त्यांना पुढील उपचारासाठी कुठे पाठवायचं, याचीही वर्गवारी करण्यास मदत होईल. महापालिकेनं हॉटेल्सची मदत घेतली आहे. त्या हॉटेल्समध्ये कोविड सेंटरसारखेच प्रशिक्षित डॉक्टर आणि इतर सुविधा असतील. अशा हॉटेल्समध्ये बरं झाले आहेत, तरीही खासगी बेड अडवून ठेवलेले आहेत. त्यांच्यासाठी ही व्यवस्था आहे. ज्यांना जिथं राहणं परवडेल, त्यांनी तिथं राहावं अशी व्यवस्थाही केलेली आहे. बेड अडवून ठेवल्यामुळे गरज असलेल्या रुग्णांना बेड उपलब्ध होत नाहीत," असं महापौर म्हणाल्या.

### रायगड राज्य उत्पादन

त्यांच्याकडून रुपये 5 लाख 87 हजार 830/-रुपये किंमतीचा मुद्देमाल या पथकाने जप्त केला. ही कारवाई राज्याचे राज्य उत्पादन शुल्क आयुक्त श्री. कांतीलाल उमाप, संचालक (अंमलबजावणी व दक्षता) श्रीमती उषा राजेंद्र वर्मा, कोकण विभाग ठाणे विभागीय उपायुक्त श्री. सुनिल चव्हाण, रायगड-अलिबाग अधीक्षक श्रीमती किर्ती शेडगे, उपअधीक्षक श्री. विश्वजीत देशमुख, यांच्या मार्गदर्शनाखाली विभागीय भरारी पथक ठाणेचे निरीक्षक श्री. आनंदा कांबळे, निरीक्षक श्री. एस. एस. गोगावले, निरीक्षक श्री. अविनाश रणपिसे, दुय्यम निरीक्षक श्री. एस. एस. गायकवाड, दुय्यम निरीक्षक श्री. ए. सी. मानकर तसेच श्री. पालवे, जवान नि-वाहनचालक श्री. संदीप पाटील, श्री. हाके, जवान श्री. डी. डी. पोटे, श्री. एस. ए. मोरे तसेच विभागीय भरारी पथक ठाणे यांचा स्टाफ जवान श्री. आजगावकर, श्री. अविनाश जाधव, श्री. दिपक घावटे, श्री. गिते व जवान-नि-वाहनचालक श्री. सदानंद जाधव यांनी पूर्ण केली. तसेच या कारवाईत श्री. मनोज अनंत भोईर व श्री. अनंत दत्तू जगदाडे यांनी सहकार्य केले. या गुन्हयाचा पुढील तपास अधीक्षक श्रीमती. किर्ती शेडगे यांच्या मार्गदर्शनाखाली दुय्यम निरीक्षक श्री. शिवाजी गायकवाड हे करीत आहेत.

### कोवीड-19 नियमावलीचे

योजना २०२० चे नियम ११ सह आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ (ब) साथ रोग अधिनियम २.३,४ व मुंबई पोलीस अधिनियम ३३ (डब्ल्यु) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.२)नटराज बार ॲण्ड रेस्टॉरंट, नवघर फाटक रोड, भाईदर पुर्व येथे शासनाने ठरवून दिलेल्या नियमांचे अटी शर्तीचे तसेच सोशल डिस्टन्स चे पालन न करता,विनामास्क गर्दी जमविलेल्या ५ इसमाविरुध्द नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. २६२/२०२१ भा.दं.वि.सं.कलम १८८,२६९, २७०,२७१,२९० सह महाराष्ट्र कोवीड उपाय योजना २०२० चे नियम ११ सह आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ (ब) साथ रोग अधिनियम २,३,४ व मुंबई पोलीस अधिनियम ३३ (डब्ल्यू) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.३) एम.जी.कंट्री बार,नवघर रोड,

भाईंदर पुर्व येथे शासनाने ठरवून दिलेल्या नियमांचे अटी शर्तीचे तसेच सोशल डिस्टन्सचे पालन न करता,विनामास्क गर्दी जमविलेल्या १६ इसमांविरुध्द नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. 1 २५९/२०२१ भा.दं.वि.म.कलम १८८,२६९,२७०, २७२,२९० सह महाराष्ट्र कोवीड उपाय योजना २०२० चे नियम ११ सह आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ११ (ब) साथ रोग अधिनियम २,३,४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.सदरची कारवाई ही दि. ०३.०४.२०२२ रोजी रात्री ८.३० वा. ते ९.०५ या दरम्यान मा. श्री. अमीत काळे, पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-२,श्री शशीकांत भोसले, सहा. पोलीस आयुक्त, नवघर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वपोनिरी/मिलींद देसाई, पोनि/मराठे(प्रशासन), पोलीस निरिक्षक /मासाळ(गुन्हे), स पोलीस निरिक्षक/ भास्कर पुल्ली पाोउनि/किरण बंजारी, पोउनि/संदिप ओहोळ, पोना/प्रशांत वाघ, आणि पथकाने केलेली आहे.

### किरकोळ वादातून जिवे ठार

आरोपीवर शोध घेवुन, गुन्हयाचे तपासावरू निष्पन्न करुन खालील नमुद आरोपीवर तात्काळ अटक करण्यात आली. आरोपीकडे अतिशय कौशल्यपुर्ण तपास करून नमुद गुन्ह्यात वापरलेले हत्यारे, दोन मोटर सायकल इत्यादी हस्तगत करण्यात आली आहेत. सदरचा गुन्हा तत्परतेने तपास करून २४ तासात उघडकीस आणुन सर्व आरोपी इसम यांना तातडीने अटक करण्यात आलेली आहे.सदरचा तपास हा मा. सहा. पोलीस आयुक्त वाशी विभाग श्री. विनायक आ. वस्त सो. यांचे मार्गदर्शनाखाली व.पो नि, श्री. प्रदिप तिदार सो, पो.नि. श्री. कदम,सपोनि गायकवाड है कौशल्यपुर्णतेने करीत आहेत. अटक आरोपी मा, कोर्टाचे आदेशान्वये दि. १५/०४/२०२१ रोजी पर्यत पोलीस कोठडीमध्ये आहेत.सदरचा कौशल्यपुर्ण तपास हा मा. पोलीस आयुक्त श्री. विपीनकुमार सिंह सो, मा. पोलीस सह आयुक्त श्री. जय जाधव सो., मा. पोलीस उपआयुक्त, परीमंडळ ०१ वाशी श्री सुरेश मेगडे साो, यांच्या मार्गदर्शनाखाली मा. सहा. पोलीस आयुक्त वाशी विभाग श्री. विनायक वस्त सो., न.पो.नि. श्री, प्रदिप तिदार साो, पो.नि. कदम, कोपरखैरणे पोलीस ठाण्याचे स.पो.नि. गायकवाड, पो.उ.नि. राठोड, पो.उ.नि. बोडरे, पो. उ.नि. पो.उ.नि. धुमाळ, सफी कदम पथक यांनीपार पाडले.

### असा साजरा करा यंदाचा गुढी पाडवा

आली आहे. सार्वजनिक ठिकाणी एकावेळी 5 पेक्षा जास्त लोकांनी एकत्र येऊ नये. सोशल डिस्टन्स व स्वच्छतेच्या सर्व नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. गुढी पाडव्यादिवशी आरोग्य विषयक उपक्रम राबवावेत. शासनाने कोविड 19 च्या अनुषंगाने दिलेल्या सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, असेही आदेशात म्हटले आहे. कशी उभारतात गुढीचैत्र शुद्ध प्रतिपदा हा शालिवाहन शकाचा पहिला दिवस म्हणजे गुढी पाडवा. या दिवशी कुटुंबातल्या सर्व स्त्री पुरूषांनी पहाटे उठून स्नान करावे. तत्पूर्वी घर स्वच्छ करावे. मुख्य प्रवेशद्वाराबाहेर रांगोळी काढावी. दाराला आंब्याच्या पानांचे व झेंडूच्या फुलांचे तोरण बांधावे. वडिलधाऱ्या व्यक्तीने घरातल्या देवांची मनोभावे पूजा करावी. आदल्या दिवशी विकत आणलेली वेळूची काठी आणून, ती धुवून तिच्या टोकाला धुतलेले स्वच्छ वस्त्र आणि सुवासिक पु‌ष्पांची माळ बांधून त्यावर चांदीचा गडू, लोटी किंवा फुलपात्र अडकवावे. नंतर सर्व कुटुंबीयांच्या उपस्थितीत गुढी उभारावी. धर्मशास्त्रात यालाच ब्रह्मध्वज अशी संज्ञा आहे.

# लाचप्रकरणी डॉ. मुरुडकर यांना पोलीस कोठडी

ठाणे : व्हेंटीलेटर पुरवठ्याची निविदा मंजुर करून देण्यासाठी एका कंपनीकडून १५ लाख रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी अटकेत असलेले ठाणे महापालिकेचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. राजू मुरूडकर यांना रविवारी ठाणे न्यायालयात हजर करण्यात आले. त्यांना १३ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

सोमवारपासून या प्रकरणात आता निविदा प्रक्रियेत सहभागी असलेल्या महापालिकेच्या पाच ते सहा अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची चौकशी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडून केली जाणार आहे.

## संपादकीय...



# सम्राज्ञीची सावली!

आपल्या जीवनकाळात इतिहासाला वळण देणाऱ्या अनेक घटना त्यांनी पाहिल्या आणि त्या प्रत्येक वळणावर सम्राज्ञी एलिझाबेथच्या पाठीशी आपल्या मिस्कील हास्यासह ते उभे राहिले...

प्रिन्स फिलीप यांच्या निधनाच्या वृत्तास जी प्रसिद्धी मिळाली त्यावरून काही त्याचे वर्णन 'हे गुलामी मानसिकतेचे लक्षण' असे करतील. अशांचे काहीही होऊ शकत नाही. खरे तर कोणतेही पद नाही, कसलेही अधिकार नाहीत, आयुष्यात सम्राज्ञीच्या प्रभावळीत राहण्यापलीकडे काही कृती नाही आणि तरीही संपूर्ण जग, यात 'राष्ट्रकुल'बाह्य देशही आले, या व्यक्तीच्या निधनाची इतकी दखल का घेतात याचा विचार व्हायला हवा. रामायणात राम आणि लक्ष्मण यांच्या गुणगौरवात मग्न होत उर्मिलेचे स्मरणही न करणाऱ्या समाजात असा विचार केला जाणे असंभव. प्रत्येक यशस्वी पुरुषामागे एक स्त्री असते असले काही बकवास ऐकण्याची सवय झाली, की एके काळच्या खऱ्याखुऱ्या महासत्तेच्या सम्राज्ञीमागे आपले अस्तित्व विरघळून टाकणाऱ्या या पुरुषाचे मोठेपण लक्षात न येण्याचा धोका आहे. तो टाळून ड्यूक



ऑफ एडिंबरा यांचे आयुष्य काय होते आणि म्हणून ते संपणे म्हणजे काय, हे लक्षात घ्यायला हवे.

वास्तविक फिलीप हे राणी एलिझाबेथ हिच्यापेक्षाही अधिक राज-रक्ताचे. एलिझाबेथ या फक्त वडिलांकडूनच खानदानी घराण्यातल्या. पण फिलीप यांचा राज-वारसा दोन्ही बाजूंचा. ग्रीसआणि डेन्मार्क या दोन्ही देशांतील सम्राटाचे हे घराणे. पुढे त्याची वाताहत झाली आणि वडील भलतीचाच हात धरून नौकेवर राहू लागले. अशा वेळी निर्वासिताचे जगणे नशिबी आलेले फिलीप आधी शिक्षण आणि नंतर नोकरीच्या निमित्ताने ब्रिटनला आले. ब्रिटिश नौदलात त्यांची निवड झाली आणि अंगभूत कर्तबगारीने प्रगतीची संधीही समोर होती. अशा वेळी तरुण एलिझाबेथ त्यांच्या प्रेमात पडते काय आणि अकल्पितपणे सम्राज्ञीपदाचा मुकुट मस्तकी धारण करण्याची वेळ तिच्यावर येते काय... सारेच अचंबित करणारे! वास्तविक एलिझाबेथ यांचे वडील सम्राटपदाच्या रांगेत नव्हते. पण त्यांचे ज्येष्ठ बंधू, म्हणजे एलिझाबेथ हिचे काका किंग एडवर्ड (आठवे) यांना प्रेमासाठी राजघराण्याचा त्याग करावा लागल्याने एलिझाबेथ यांच्या वडिलांकडे सम्राटपद गेले. त्यांना दोन्ही मुली. एलिझाबेथ आणि मार्गारिट. ते कडवे धूम्रपानी अग्निहोत्री. तेव्हा अकाली मरण अटळ. ते आले आणि ध्यानीमनी नसताना त्यांची ज्येष्ठ कन्या म्हणून एलिझाबेथ यांना सम्राज्ञीपदाचा मुकुट मस्तकी धारण करावा लागला. वैयक्तिक कथा म्हणावी तर इतकीच. पण त्याची महाकथा तयार झाली ती वातावरणाच्या पार्श्वभूमीमुळे!

प्रिन्स फिलीप यांचे लग्न झाले तेव्हा ते २६ वर्षांचे होते आणि एलिझाबेथ अवघ्या २१ वर्षांच्या. साल १९४७. दुसऱ्या महायुद्धाची राख अजूनही धगधगत होती आणि ग्रेट ब्रिटनच्या महासत्तामुकुटातील 'कोहिनूर' भारत हा स्वतंत्र झाला होता. ब्रिटनचे उरलेसुरले महासत्तापणही संपवून टाकावे यासाठी सोव्हिएत युनियन ते अनेक युरोपीय देश देव पाण्यात बुडवून बसले होते आणि आयसेनहॉवर यांची अमेरिका पाहुण्याच्या वहाणेने विंचू मेला तर बरे म्हणत ब्रिटनच्या वाताहतीकडे शांत पाहात होती. दुसऱ्या महायुद्धाने ब्रिटनला विजयी केले खरे. पण सर्व रया गेली होती. पण काप गेल्यावरही भोके राहतात त्याप्रमाणे स्वत:चे महासत्तापण ब्रिटनच्या मनातून उतरत नव्हते. पक्षाघाताच्या झटक्यानंतरही चर्चिल यांची सत्ताकांक्षा संपली नव्हती आणि त्यानंतर पंतप्रधानपदी आलेले ॲटली यांची ते पद सांभाळण्याची कुवत नव्हती. अत्यंत अननुभवी सम्राज्ञी आणि आसपासची परिस्थिती ही अशी! अशा वातावरणात राजबिंड्या, कर्तृत्ववान फिलीप यांचा पुरुषीपणाचा फणा पदोपदी दुर्लक्षिला जात होता. नौदलातील आश्वासक कारकीर्द की महाराणीचा काहीही अधिकार नसलेला साथीदार- यातून एक पर्याय निवडण्याचा अवघड प्रसंग त्यांच्यासमोर होता. अनपेक्षितपणे सर्वस्व हिरावून जाणे हे जितके शोककारी असते तितकेच नको असताना, इच्छा नसताना बरेच काही मिळणे हेदेखील तापदायक असते. फिलीप हे अनुभवत होते. त्यांचा मोठेपणा असा की, सनातनी, पुरुषप्रधान, अहंकारी समाजात जगत असतानाही त्यांनी अत्यंत पुरोगामी, स्त्रीसन्मानकारी आणि नम्र निर्णय घेतला. आपल्यावर जिचे नितांत प्रेम आहे त्या एलिझाबेथसाठी आपल्या साऱ्या पुरुषीपणास त्यांनी मुरड घातली आणि आपल्या जोडीदारिणीचा साथीदार बनून दुय्यम आयुष्य जगणे निवडले. सम्राट पुरुषासाठी आपले सर्वस्व पणास लावणाऱ्या आणि तेजाची सावली बनून जगणाऱ्या महिला अनेक आहेत. पण आपल्या पत्नीच्या कर्तृत्वाची पणती पेटती राहावी म्हणून स्वत:च्या अस्तित्वाची वात जाळत राहिलेले पुरुष विरळा.

# इतका अट्टहास कशासाठी?

केंद्र सरकारमधील मंत्री राज्या-राज्यांतील सरकारांविरोधात इतके आक्रमक होऊन बोलू लागले आहेत, जणू केंद्रात अन्य कोणतेही गंभीर प्रश्नच नसावेत. गैरव्यवस्थापन होते ते राज्यात, केंद्रात नव्हेच- असे दाखवण्याचा हा अट्टहास विरोधकांना सत्तेवरून पायउतार होण्यासाठी टाकलेल्या दबावाच्या नीतीचा तर भाग नव्हे?

भाजपचे केंद्रातील तसेच राज्यांतील नेते दिल्लीत येऊन कधी गृहमंत्र्यांची भेट घेतात, कधी गृह सचिवांकडे विनंती करतात, कधी आरोग्यमंत्र्यांशी चर्चा करतात आणि मग आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडतात. गेले महिनाभर राज्यातील महाविकास आघाडीला झोडपून काढण्याचा खेळ खेळला जात आहे. त्यावरून कोणासही वाटू शकेल की, भाजपला काहीही करून महाराष्ट्रातील सत्ता काबीज करायची आहे! मध्य प्रदेशमध्ये हाच सत्तापालटाचा डाव मांडला गेला, त्यात यश आले. राजस्थानमध्ये काँग्रेस नेते सचिन पायलट यांना ३० आमदार आपल्या गटात आणता आले नसल्याने भाजपला राजस्थानमध्ये सत्तापरिवर्तनाचे मनसुबे अखेर सोडून द्यावे लागले. गेले सुमारे दीड वर्ष महाराष्ट्रात सत्ताबदल होईल असे भाजपचे नेते सातत्याने सांगत आहेत; आता त्यांना राज्यातील सत्ताधारी पक्षांविरोधात दोन तगडे मुद्दे मिळाले असल्याने भाजपने जोरदार आघाडी उघडली असल्याचे या नेत्यांच्या पत्रकार परिषदांवरून तरी दिसते.

दोन दिवसांपूर्वी केंद्रीय मंत्र्यांनी पत्रकार परिषद घेऊन राज्यातील मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. त्यासाठी आधार घेतला तो अटक झालेले पोलीस अधिकारी सचिन वाझे यांच्या न्यायालयाला लिहिलेल्या पत्राचा. हे पत्र कोणी प्रसारमाध्यमांपर्यंत पोहोचवले, हा प्रश्न वेगळाच. वास्तविक, या पत्रकार परिषदेत राज्यातील लसीकरणाच्या मुद्द्यावर प्रकाश पडेल असे वाटले होते. कारण आदल्या दिवशी याच मुद्द्यावरून भाजपने व नंतर खुद्द केंद्रीय आरोग्यमंत्री हर्षवर्धन यांनी आकांडतांडव केले होते. पण त्या दिवशी वाझेंचा मुद्दा हाताशी लागला होता. म्हणजे भाजपने आलटून-पालटून वाझे व करोना या दोन मुद्द्यांवरून महाविकास आघाडी सरकारला लक्ष्य बनवले असल्याचे दिसले. खरे तर केंद्रातील सत्ताधारी पक्षाला केंद्रातच अनेक प्रश्नांनी विळखा घातलेला आहे, तरीही तो सोडवण्याऐवजी राज्यांत 'हस्तक्षेप' करण्यापासून हा पक्ष स्वत:ला रोखू शकत नाही. कोणाला हा केंद्रातील सत्ताधारी पक्षाचा वा राज्यातील त्यांच्या नेत्यांचा उतावीळपणा वाटू शकेल.



राज्या-राज्यांमध्ये टाळेबंदीची चर्चा केली जात आहे. महाराष्ट्रात ती प्रत्यक्षात येण्याची शक्यता आहे. अशा वेळी केंद्राचे टाळेबंदीसंदर्भातील धोरण काय आहे, याबाबत संदिग्धता निर्माण झाली आहे. पाच राज्यांमधील विधानसभेच्या निवडणुका झाल्यानंतर देशभर टाळेबंदी लागू केली जाऊ शकते, अशी भीती लोकांच्या मनात निर्माण होऊ लागलेली आहे. गेल्या वर्षीच्या टाळेबंदीतील नुकसानीमुळे खचलेल्या जनतेला आपण पुन्हा त्याच खाईत लोटले जाऊ असे वाटत असेल, तर त्यांचे शंकानिरसन करण्याची जबाबदारी केंद्राची आहे. केंद्रापुढे स्थलांतरित मजुरांचा प्रश्न नव्याने आणि तितक्याच तीव्रतेने उभा राहण्याची शक्यता आहे. करोनाचा प्रादुर्भाव वाढला, परिणामी निर्बंधही कडक झाले तर आपले कसे होणार, ही चिंता छोटे उद्योग-व्यावसायिकांना सतावू लागलेली आहे. केंद्रीय आरोग्यमंत्री, त्यांचे सचिव, करोना कृती गटाचे प्रमुख यांच्याकडून लशींच्या उत्पादनाची नेमकी आकडेवारी दिली जात नाही. आरोग्यमंत्री 'फेसबुक-लाइव्ह' करतात, सचिव, गटप्रमुख पत्रकार परिषदा घेतात. त्यांपैकी कुठल्याही व्यासपीठावरून- लशींचे उत्पादन किती होत आहे, किती लसकुप्या खरेदी केल्या जाणार, केंद्राकडे किती साठा आहे, तो कसा पुरवला जाईल, अशी कोणतीही माहिती दिली गेलेली नाही. राज्यांना लसकुप्यांचा तुटवडा होणार नाही, एवढेच उत्तर केंद्रीय स्तरावरून दिले जात आहे. महाराष्ट्रापुरतेच बोलायचे तर भाजपच्या खासदारांनी केंद्रीय आरोग्यमंत्र्यांची भेट घेतली. मग त्यांनी राज्याला किती लसकुप्या मिळतील याची आकडेवारी दिली. ती आकडेवारी या खासदारांनी प्रसारमाध्यमांना दिली, पण या आकडेवारीत आणि प्रत्यक्ष राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी दिलेल्या आकडेवारीत फरक होता. मग कोणती आकडेवारी खरी? केंद्राकडून राज्याला लशीचा पुरवठा होत असतो. ही आकडेवारी राज्याने अधिकृतपणे जाहीर करणे अपेक्षित असते. कोणा खासदाराने केंद्रीय मंत्र्यांची भेट घेतली म्हणून कोणतीही आकडेवारी प्रसारमाध्यमांमधून फिरत राहणे उचित नव्हते. पण राज्यावर शाब्दिक हल्लाबोल करण्याची संधी कोणालाही सोडायची नसल्याने राज्याच्या लसीकरणासंदर्भात घोळ निर्माण होत राहिला आणि तो वाढवला गेला असे दिसते.

करोनाव्यतिरिक्त इतरही प्रश्न केंद्रासमोर आहेत. केंद्राकडून नजरचुकीने अनेक गोष्टी होत राहिल्या आहेत. पण आर्थिक नजरचूक महागात पडते हे केंद्रीय अर्थ खात्याला थोडे उशिरा कळले. सत्ता काबीज करण्याच्या ईर्षेपोटी सुशासनाकडे दुर्लक्ष कसे होऊ शकते, हे अर्थ खात्यावर ओढवलेल्या नामुष्कीवरून दिसले. अल्पबचत योजनांवरील व्याज दर कमी करण्याचा निर्णय २४ तासांच्या आत रद्द केला गेला. पश्चिम बंगालमध्ये अल्पबचत योजनांमध्ये पैसे गुंतवणाऱ्या गरीब आणि कनिष्ठ मध्यमवर्गाची संख्या मोठी असून त्याचा विधानसभा निवडणुकीत फटका बसू शकतो, हे आधी केंद्रातील धोरणकर्त्यांच्या लक्षात आले नाही. मग धावाधाव करावी लागली, 'नजरचुकी'ची दुरुस्ती करावी लागली. केंद्राच्या गैरव्यवस्थापनाचा हा एक नमुना म्हणता येईल. नवी गुंतवणूक, नवे रोजगार यांवर केंद्रीय अर्थमंत्र्यांचे बोलणे थांबलेले आहे. आधार उरला आहे तो केंद्रीय रस्तेविकास मंत्रालयाचा! नितीन गडकरींनी गेल्या आठवडाभरात राज्या-राज्यांमधील रस्तेबांधणीसाठी भरघोस निधी देऊ केला आहे, त्या संदर्भात या मंत्रालयाने धडाधड घोषणा करून टाकल्या. परंतु बँकांच्या खासगीकरणाविरोधात संप पुकारले जात आहेत. आर्थिक आघाडीवर आलबेल नसल्याचे हे सगळे स्पष्ट संकेत मिळत असताना राफेल लढाऊ विमानांच्या खरेदीतील कथित भ्रष्टाचाराचा मुद्दा पुन्हा उपस्थित झालेला आहे. कितीही प्रयत्न केला तरी राफेल खरेदीची चर्चा संपलेली नाही. पुन्हा नवे आरोप होत आहेत, त्यावर स्पष्टीकरण द्यावे लागत आहे. 'सर्जिकल स्ट्राइक' करून ज्या पाकिस्तानला धडा शिकवला, त्याच पाकिस्तानच्या पंतप्रधानांना अदबीने पत्र लिहावे लागले आहे. चीनला आपल्या सीमेतून हद्दपार केले, असे अजूनही केंद्रीय संरक्षण मंत्रालयास म्हणता आलेले नाही. इतके सारे घोळ, गैरव्यवस्थापन, नजरचुका होत असताना केंद्रातील सत्ताधारी पक्षाची कुठल्या ना कुठल्या राज्यात विरोधकांची सत्ता संपुष्टात आणण्याची दुर्दम्य इच्छा खरोखरच वाखाणण्याजोगी आहे!

राज्यासंदर्भात हे नेते दररोज कधी दिल्लीतून, कधी राज्यातून कोणते ना कोणते विधान करताना दिसतात. आता या मंडळींनी मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्याची थेट मागणी केलेली आहे. वाझे प्रकरणाची राष्ट्रीय तपास यंत्रणा एनआयए ही स्वतंत्र चौकशी करत आहे. माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या सीबीआयच्या प्राथमिक चौकशीला सर्वोच्च न्यायालयानेही हिरवा कंदील दिला आहे. आता या चौकशींशी 'राज्य सरकार'चा थेट संबंध नाही. पण चौकशींतून काही निष्पन्न होण्याआधीच भाजपला महाविकास आघाडी सरकार बरखास्त करायचे असावे असे दिसते. केंद्रीय आरोग्यमंत्री हर्षवर्धन यांनी लसीकरणावरून राज्यांना लक्ष्य बनवताना दिल्ली, झारखंड आणि पंजाबचा उल्लेख केला असेल, पण त्यांना आगपाखड करायची होती ती फक्त महाराष्ट्रावर. त्यांच्या निवेदनातील भाषाही राज्य सरकार कसे नाकर्ते आहे, हे ठसवणारी होती. परंतु फक्त महाराष्ट्रानेच लसकुप्यांचा तुटवडा असल्याची तक्रार केलेली नाही. ओडिशासारख्या तुलनेत छोट्या राज्यानेही ही तक्रार केली होती. भाजपप्रणीत राज्यांना लसकुप्यांचा तुटवडा भासत नसेल असे नव्हे; पण केंद्रातील सत्तेविरोधात बोलता येत नसल्याने ते बोलणार नाहीत. राज्यांमध्ये ठिकठिकाणी लसीकरण केंद्रे बंद पडत आहेत ही बाब कशी नाकारणार? लसकुप्यांच्या तुटवड्याशी करोनायोद्ध्यांचे लसीकरण किती झाले याचा काहीही संबंध नव्हता. पण केंद्रीय आरोग्यमंत्र्यांच्या निवेदनात त्याचा तपशील दिलेला आहे. लसमात्रा वाया जाण्याचा मुद्दा केंद्रीय मंत्र्यांनी सातत्याने मांडला असला, तरी फक्त महाराष्ट्रात लसमात्रा वाया गेलेली नाही, अन्य राज्यांमध्येही तसे झालेले आहे. आधी बिगरवैद्यकीय केंद्रांत लसीकरण सुरू करण्याची मागणी फेटाळली गेली. मग कार्यालयांत लसीकरण केंद्रे सुरू करण्याला मुभा देण्यात आली. केंद्राच्या धोरणातील हा विरोधाभास राज्यांनी चव्हाट्यावर आणला तर त्यांच्याविरोधात एखादी मोहीम चालवली जावी, असा आक्रमक पवित्रा केंद्र सरकारकडून घेतला जात असल्याचे दिसते.

## घरापर्यंत पाठलाग केला; तिचा नवरा घराबाहेर पडताच 'तो' बेडरूममध्ये घुसला अन्



बेंगळूरू: ३५ वर्षांचा तरूण. किराणा दुकानात महिलेशी तोंडओळख झाली. त्याने घरापर्यंत तिचा पाठलाग केला. ती कोणत्या घरात राहते याची खात्री करून घेतली. सकाळी तिचा नवरा घराबाहेर काही कामानिमित्त पडला. ती एकटीच घरात असल्याची संधी साधून तो घरात घुसला. तिच्या बेडरूममध्ये गेला आणि तिच्यावर बलात्काराचा प्रयत्न केला. तिने त्या नराधमाच्या तावडीतून कशीबशी सुटका करून घेतली. बेडरूममधून बाहेर आली. शेजाऱ्यांना मदतीसाठी हाक मारली. सगळा आरडाओरडा ऐकून तिची दीड वर्षांची मुलगीही जोरजोरात रडू लागली. शेजारी धावून येण्याआधीच त्या तरुणाने पळ काढला. दक्षिण बेंगळुरूत ही घटना घडली. प्रताप असे आरोपीचे नाव आहे. दक्षिण बेंगळुरूच्या कोलार परिसरात तो राहतो. पोलिसांनी त्याला अटक केली आहे. प्रताप हा पत्नी आणि चार वर्षांच्या मुलासह या भागात राहतो. तर ही महिला दक्षिण बेंगळुरूत नुकतीच राहायला आली आहे. ती भाडेतत्वावर खोली घेऊन राहते. महिलेचा पती हा ड्रायव्हर आहे. तो नेहमीच शहराबाहेर जात असतो. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीने तिच्यावर पाळत ठेवली होती. बऱ्याच दिवसांपासून तो तिच्यावर लक्ष ठेवून होता. त्याने घरापर्यंतही पाठलाग केला होता. पती घराबाहेर पडल्यानंतर तिच्या घरात घुसायचा कट त्याने आखला होता. "काही दिवसांपूर्वीच एका किराणा दुकानात प्रतापशी तोंडओळख झाली होती. दुकानासमोरील रांगेत तो उभा होता. त्याने माझ्या दीड वर्षांच्या मुलीशी बोलण्यास सुरुवात केली. मला एक मुलगा असून, एक मुलगी हवी आहे, असे तो सांगत होता. तो तिथून निघून गेल्यानंतर दुकानदाराने मला त्याच्याबाबत सांगितले. तो चांगल्या वृत्तीचा नसून, त्याच्यापासून लांब राहा, असे दुकानदार म्हणाला. मी त्यावर घरी आले. पण तो असे काही करील याचा विचारही केला नव्हता. मी पुन्हा त्याच्याशी कधीही बोलले नाही. सोमवारी सकाळी मी खोलीत झोपले होते. तो अचानक घरात घुसला आणि माझ्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला," असे महिलेने पोलिसांना सांगितले.

## उद्योजकाची आत्महत्या; युवतीस अटक



प्रेमाच्या जाळ्यात अडकवून वारंवार पैशांची मागणी करणाऱ्या तरुणीच्या जाचाला कंटाळून विवाहित उद्योजकाने शेततळ्यात उडी घेवून आत्महत्या केल्याचे शुक्रवारी उघड झाले होते. शरद उत्तम शेळके (३४, रा. फेरणजळगाव ता.जि. औरंगाबाद, ह. मु. विष्णुनगर) असे मृत उद्योजकाचे नाव असून त्यांची शेंद्रा येथे श्री समर्थ इंटरप्रायजेस नावाची डिस्पोजल कपची कंपनी आहे. या प्रकरणी करमाड पोलिसांनी तपास करुन शनिवारी पहाटे एका तरुणीला अटक केली. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी एच. एस. पुराडउपाध्ये यांनी तिची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली.

मृत शरद यांचे वडील उत्तम शेळके (६८) यांनी फिर्याद दिली. त्यानुसार, फेरनजळगाव येथे त्यांचे शेत असून तेथे तळेही आहे.

शरद विवाहित असून गेल्या दहा ते पंधरा दिवसांपासून तो नाराज होता व घरात कोणाला काही बोलत नव्हता. त्यांनी चार-पाच दिवसांपूर्वी विश्वासात घेवून चौकशी केली असता, एक २३ वर्षीय मुलगी त्याला शारीरिक व मानसिक त्रास देत असल्याचे सांगितले.

तिला राफे काझी नावाचा मुलगा मदत करीत असल्याचेही सांगितले होते. आठ एप्रिल रोजी सकाळी शरद नेहमीप्रमाणे कंपनीत जातो म्हणून घरातून निघाला होता. मात्र, नऊ एप्रिलला सकाळी ११ वाजता तो शेतात बेशुद्ध आढळला. उपचारांसाठी घाटीत दाखल केले. तेथे डॉक्टरांनी शरदला मृत घोषित केले.

शरदचा मृतदेह आढळल्यानंतर त्याच्या बॅगेत आठ पानी चिठ्ठी आढळली.

**MIRA BHAINDAR MUNICIPAL CORPORATION**
**Public Works Department**
**Indira Gandhi Bhavan, Chhatrapati Shivaji Maharaj Marg,**
**Bhaindar (W) 401101. Tal. Dist-Thane,**
**28192828**

No. MNP/PWD/Tender / 07 / 2021-22 Date : - 9/4/2021

**// Tender Notice No.7 //**

Mechanised Desilting of Strom Water Culverts & Chambers with specialised Machinery in MBMC Area. The Tender documents are available on MBMC website https://mahatenders.gov.in from 13/04/2021 to 21/04/2021 up to 12.00 PM & submit the tender dully filled on https://mahatenders.gov.in Submission date 22/04/2021 up to 12.00 PM hrs.

**जा क्र./ मनपा/जनसंपर्क/२६/२०२१-२२**
**दि. १०/०४/२०२१**

Sign/-
Executive Engineer (PWD)
Mira Bhaindar Municipal Corporation

# वालीव पोलीसांची धाडसी कारवाई



सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार वालीव पोलीस ठाणे गु.रजि.नं. ॥ ३५२/२०२१ भादविस कलम ३७९ प्रमाणे दाखल वाहन चोरीच्या गुन्हयातील आरोपीत याचा शोध घेत असतांना तांत्रिक माहीती व गुप्त बातमीव्दारे माहीती घेऊन वाहन चोरी करणारा आरोपी नामे. विमलेश बेचु वर्मा वय ३१ वर्षे राहायला उत्तरप्रदेश आरोपी यास दिनांक ०३.०४.२०२१ अटक करुन त्याचेकडुन गुन्हयातील चोरीस गेलेले मोटार सायकल हस्तगत केली.

आरोपीकडे अधीक विचारपुस केली असता त्याने वालीव, तुळींज, मिरारोड व मुंबई परीसरातुन वाहन चोरी केल्याची कबुली देवुन चोरीच्या ६ मोटार सायकल काढुन दिल्या.आरोपी याचे कडुन वालीव पोलीस ठाण्याचे ३ मोटार सायकल, तुळींज पोलीस ठाण्याचे १ मोटार सायकल व मिरारोड, मुंबई परीसरातील २ मोटार सायकल असे एकुण ६ वाहन १,३५,०००/- रुपये किंमतीच्या हस्तगत करण्यात आले असुन खालील प्रमाणे गुन्हे उघडकिस आले आहेत.

सदरची कामगीरी श्री.प्रशांत वाघुडे,पोलीस उपायुक्त, परीमंडळ-३ तसेच श्री अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त,तुळीज यांचे मार्गदर्शनाखाली वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विलास चौगुले, पोलीस निरीक्षक श्री.चंद्रकांत सरोदे, पोलीस निरीक्षक श्री.दादासाहेब कारांडे तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि ज्ञानेश फडतरे आणि पथक यांनी केलेली आहे.

# दागिने चोरी करणाऱ्या महिलेला वसई पोलीसांनी केली अटक ; ९ तोळे दागिने हस्तगत



नालासोपारा येथे राहणारे हरीश विनायक वैती, वय.३७ वर्षे यांनी वसई पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली की, दिनांक. ०१/०४/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता ते दि. ०२/०४/२०२१ रोजी १२.०० वाजताच्या दरम्यान त्याच्या राहत्या घरातुन कोणीतरी अज्ञात चोरट्याने प्रवेश करून कपाटामधील स्टीलच्याडब्यामध्ये ठेवलेले एकुण २,१५,०००/- रु किमतीचे सोन्याचे दागिने त्याच्या संमती शिवाय राहत्या घरातुन चोरी करुन चोरुन नेले. सदरबाबत वसई पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि क्र. 1 १६५/२०२१ भा.दं.वि.स कलम ३८० अन्वये दाखल करण्यात आलेला होता.सदरचे गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन पोउपनिरी/बी.एम.पालवे व गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी/कर्मचारी यांनी कौशल्यपुर्ण तपास करून आरोपी नामे प्रियंका अल्पेश तरे, वय २० वर्षे, राहायला भिवंडी हिस नायगाव परिसरातुन येथून अटक केली.आरोपी कडून गुन्हयात चोरी केलेले एकुण ९तोळे वजनाचे एकुण २,१५,०००/- रु किमतीचे सोन्याचे दागीने हस्तगत करण्यात आले. सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-२ वसई, श्री. प्रदिप गिरीधर, सहा.पोलीस आयुक्त, वसई विभाग,यांचे मार्गदर्शनाखाली मा. श्री. कल्याणराव कर्पे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वसई पोलीस ठाणे सपोनि/राम सुरवसे, पोउपनिरी/भगवान पालये,आणि पथकाने केली आहे.

# दुचाकी चोरी करणारे आरोपी अटकेत ; 25 मोटार सायकल जप्त



मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांनी मोटार सायकल चोरीच्या गुन्हयांना आळा बसविण्यासाठी मोटार सायकल चोरांचा शोध घेण्याचे आदेश दिलेले होते. त्यानुसार श्री. डॉ.महेश पाटील पोलीस उप आयुक्त (गुन्हे), यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे प्राप्त केलेल्या तांत्रिक तपास व मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे सदरचे गुन्हे करणारा इसम हा योगेश मांगल्या हा असल्याची माहीती मिळालेली होती. सदर बातमीच्या अनुशंगाने दिनांक ०२/०४/२०२१ रोजी १) योगेश ऊर्फ गॅनी प्रभाकर मांगेला वय.३६ वर्षे रा. रुम नं. ए-५१८, नेहरु नगर, भाईदर पोलीस स्टेशनच्या बाजुला, भाईदर पश्चिम, ता.जि. ठाणे यास ताब्यात घेण्यात आले होते.सदर आरोपीने भाईदर पोलीस ठाणे गु.रजी.नं. : ७६०/२०२० भा.द.वि.सं कलम ३७९ या गुन्हयाची कबुली दिल्याने त्यास सदर गुन्हयांत अटक करण्यात आलेली होती. तपासादरम्यान आरोपी याने सन २०१७ पासुन मुंबई, भाईंदर व मिरारोड परिसरात रात्रीच्या वेळी मोटार सायकल (ऍक्टिव्ह स्कुटर) चोरी करुन त्या अर्नाळा ता. वसई येथे राहणारे १) सचिन नारायण वैती, २) कल्पक नारायण वैती यांचे मदतीने वसई व अर्नाळा परिस प्रत विक्री केलेल्य असल्याची कबुली दिली.पुढील तपासात १) सचिन वैती, २) कल्पक वैती यांना ताब्यात घेतले असताना त्यांनी एकुण २५ मोटार सायकल्स/स्कुटर्स त्यात २० ऍक्टिव्ह, २ डिओ, १ मॅस्ट्रो, १ युनीकॉर्न, १ बजाज पल्सर अशा कंपनीची वाहने काढुन दिली आहेत. सदर गुन्हयांत नमूद तीन आरोपींना अटक करण्यात आले असुन पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आला आहे.सदरची कामगीरी श्री. डॉ.महेश पाटील पोलीस उप आयुक्त (गुन्हे), यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. रामचंद्र देशमुख सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), यांच्या सुचनाप्रमाणे श्री. अविराज कुराडे पोलीस निरीक्षक गुन्हे प्रकटीकरण शाखा-१, सहा.पो.निरी. विलास कुटे, सहा.पो.निरी. प्रवीण स्वामी, पो.उप-निरी, हितेंद्र विचारे, आणि पथक यांनी केली असून गुन्हयांचा पुढील तपास पो हवा./१८५० संजय शिंदे हे करीत आहेत.

# औरंगाबाद : चोरट्याच्या ताब्यातून पाच दुचाकी जप्त




अट्टल दुचाकी चोरट्याने विविध ठिकाणाहून चोरी केलेल्या १ लाख ३५ हजार रुपये किमतीच्या पाच दुचाकी पोलिसांनी शुक्रवारी जप्त केल्या. या चोरट्याने औरंगाबाद आणि जळगाव जिल्ह्यातून या दुचाकींची चोरी केली होती.

शेखर उर्फ अण्णा दांडगे (२८ रा. रेणुकाई पिंपळगा, ता. भोकरदन, जि.जालना) असे आरोपीचे नाव आहे. या विषयी अधिक माहिती अशी, की वाळूज महानगरातील राजेश सत्यभान कांबळे यांची मोपेड (एमएच २०, डीएस ०७२९) व लक्ष्मण मनोहर यांची दुचाकी (एमएच २०, सीझेड ३९८०) दोन वर्षांपूर्वी परिसरातून चोरीला गेली होती. या प्रकरणी वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. दरम्यान, सिल्लोड तालुक्यातील पारध पोलिसांनी काही दिवसांपूर्वी शेखर दांडगेला अटक केली होती.

त्यावेळी त्याच्या ताब्यातून लक्ष्मण मनोहर यांची दुचाकी जप्त करण्यात आली होती. ही दुचाकी वाळूज महानगरातील असल्याने न्यायालयात हस्तांतरण वारंट घेऊन दांडगे याला सात एप्रिल रोजी पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्या वेळी त्याची चौकशी केली असता त्याने औरंगाबाद व जळगाव जिल्ह्यातून पाच दुचाकी चोरल्याची कबुली दिली. आरोपीने विविध ठिकाणावरून चोरी केलेल्या दुचाकी त्याच्या मुळगावी नेऊन लपवून ठेवत होता.

तसेच तेथे ग्राहक शोधून, या दुचाकींचे हप्ते थकल्याने बँकेने जप्त केल्या असल्याची थाप मारून विक्री करत होता. पोलिसांनी आरोपी दांडगे याने विक्री केलेल्या १ लाख ३५ हजार रुपये किंमतीच्या पाच दुचाकी खरेदीदारांकडून जप्त केल्या आहेत.

# सॅल्यूट! गडचिरोलीतील चकमकीत जखमी झाला होता नक्षल कमांडर, पोलिसांनी...



गडचिरोली : गडचिरोलीतील खोब्रामेंढा येथील जंगलात २९ मार्च रोजी पोलिसांसोबतच्या चकमकीत पायाला गोळी लागून जखमी झालेल्या नक्षल कमांडरला पोलिसांनी तात्काळ रुग्णालयात दाखल केले. त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. आता त्याची प्रकृती स्थिर आहे. किशोर कवडो असे या कमांडरचे नाव आहे.

खोब्रामेंढा-हेटळकसा जंगलात पोलीस दलाच्या सी-६० पथकाचे जवान नक्षलविरोधी अभियान राबवत असताना नक्षलवाद्यांशी झालेल्या चकमकीत जहाल नक्षली भास्कर हीचामी याच्यासह पाच नक्षली ठार झाले होते. त्यानंतर कटेझरी पोलीस मदत केंद्रातील पोलिसांनी शोध मोहीम राबविली असता, तीपागड येरीया प्लाटून क्रमांक १५ चा कमांडर किशोर उर्फ गोंगलु उर्फ सोबु धीसू कवडो (३८) हा जखमी अवस्थेत आढळून आला.

किशोर कवडो यांच्या पायाला गोळी लागली होती. पोलिसांनी त्याला तात्काळ रुग्णालयात दाखल केले.

त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली असून, त्याची प्रकृती स्थिर असल्याचे पोलिसांनी सांगितले. चकमक, खून, जाळपोळ अशा अनेक गुन्ह्यांमध्ये त्याचा सहभाग आहे.

त्यामुळे पोलीस विभाग त्याच्यावर पुढील कारवाई करणार आहे.

# कॅब चालकाने गुंगीचे औषध देऊन विवाहित महिलेवर केला बलात्कार



आयटी कंपनीत नोकरी करणारी विवाहिता घरी जाण्यासाठी ओला कॅबमध्ये बसल्यानंतर चालकाने गुंगीचे औषध टाकलेले पाणी पिण्यास देऊन तिच्यावर बलात्कार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या महिलेचे अश्लील फोटो काढून ते समाजमाध्यमांवर टाकण्याची धमकी देऊन वारंवार अत्याचार केले. या प्रकरणी हडपसर पोलिस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत खराडी परिसरात राहणाऱ्या ३२ वर्षीय महिलेने तक्रार दिली आहे. त्यानुसार कॅबचालक प्रमोद बाबू कनोजिया (रा. कर्वेनगर) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चार ते ३० मार्च दरम्यान धायरी परिसरातील एका लॉजवर ही घटना घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडिता आयटी कंपनीत नोकरी करते, तर आरोपी ओला कॅबवर चालक आहे. चार मार्च रोजी महिलेने मांजरी परिसरातून घरी जाण्यासाठी कॅब बुक केली होती. कॅबमध्ये बसल्यानंतर महिलेला तहान लागली होती. आरोपीने तिला गुंगीचे औषध टाकलेले पाणी पिण्यास दिले. त्यानंतर ती बेशुद्ध झाली. आरोपीने तिला धायरी येथील गोकुळ लॉज येथे नेऊन तिचे अश्लील फोटो काढले. ते समाजमाध्यमांवर टाकण्याची धमकी देऊन महिलेवर बलात्कार केला. त्यानंतर आरोपीने तिला फोटो 'व्हायरल' करण्याची धमकी देऊन लॉजवर घेऊन जाऊन अत्याचार केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

या प्रकरणी महिलेने सुरुवातीला स्वारगेट पोलिसांकडे तक्रार देण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्यांनी तिला मुंढवा पोलिसांकडे पाठवले. तिने मुंढवा पोलिसांकडे तक्रार दिल्यानंतर महिला कॅबमध्ये बसल्याचे ठिकाण हडपसर पोलिस ठाण्याच्या हद्दीत असल्यामुळे तो गुन्हा त्यांच्याकडे वर्ग केला आहे.

# प्रियकराला फोन करून घरी बोलावून घेतले; रॉकेल ओतून दिले पेटवून




गोरखपूर: उत्तर प्रदेशातील गोरखपूरच्या शाहपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अकोलवा येथे शुक्रवारी रात्री एका तरुणावर रॉकेल ओतून जिवंत पेटवून देण्यात आल्याची घटना घडली. त्याची प्रकृती गंभीर होती. त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारावेळी त्याचा मृत्यू झाला. मृत्यूपूर्वी दिलेल्या जबाबात तरुणाने सांगितले की, त्याच्या प्रेयसीने घरी बोलावले. त्यानंतर तिने, तिच्या आई आणि बहिणींनी अंगावर रॉकेल ओतून पेटवून दिले. तरुणाच्या कुटुंबीयांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला असून, तरुणी, तिची आई आणि मोठ्या बहिणीला ताब्यात घेतले असून, चौकशी केली जात आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चिलुआताल पोलीस ठाण्याच्या हद्दीतील करीमनगर येथील २५ वर्षीय जय सिंह यादव हा पेंट पॉलिशचे काम करायचा. दोन वर्षांपूर्वी त्याची ओळख अकोलवा येथील तरुणीसोबत झाली. नंतर दोघांनी मंदिरात जाऊन लग्न केले. ते एका भाडेतत्वावर घेतलेल्या खोलीत राहू लागले. १५ दिवसांपूर्वी घरच्यांच्या दबावामुळे तरुणी आपल्या पालकांच्या घरी येऊन राहू लागली. तरुणाने तिला परत नेण्याचा अनेकदा प्रयत्न केला. पण ती देखील त्याच्यासोबत जाण्यास तयार नव्हती. शुक्रवारी संध्याकाळी तिने त्याला फोन केला आणि घरी बोलावून घेतले. घरी गेल्यानंतर तिच्या आईने आणि बहिणींनी त्याला मारहाण केली. त्यानंतर त्याच्या अंगावर रॉकेल ओतून पेटवून दिले. तरुणाला गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल केले. तेथून मेडिकल कॉलेजला पुढील उपचारासाठी नेण्यात आले. तिथे त्याचा मृत्यू झाला. तरुणाने मृत्यूपूर्वी जबाब दिला. त्याने तरुणीची आई आणि मोठ्या बहिणीवर आरोप केला. घरी बोलावून मारहाण केली. त्यानंतर रॉकेल ओतून पेटवून दिले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तरुणीचे कुटुंबीय तिच्या मोठ्या बहिणीसोबत लग्न करण्यासाठी त्या तरुणावर दबाव आणत होते.

# धक्कादायक! जीवंत महिलेला रुग्णालयाने केले मृत घोषित



करोनाबाधित महिला रुग्णाला जीवंत असताना मृत घोषित करण्याचा संतापजनक प्रकार वर्धा मार्गावरील डोंगरगावजवळील आयजीपीए हॉस्पिटल अँण्ड रीसर्च सेंटरच्या कोव्हिडालय येथे शनिवारी घडला. या प्रकारामुळे संतप्त कुटुंबीयांनी हिंगणा पोलिस स्टेशनला तक्रार दिली.

मृत घोषित करण्यात आलेल्या महिलेचे नाव आशा चंद्रभान मून (वय ६३, रा. काशीनगर, रामेश्वरी मार्ग) असे आहे. आशा मून यांची ९ एप्रिल रोजी रात्री ११.३० वाजताच्या सुमारास प्रकृती खालावली. त्यामुळे तत्काळ त्यांना इस्पितळात दाखल करण्यात आले. त्या इस्पितळात कोव्हिड सेंटर असल्यामुळे रुग्णाजवळ नातेवाईकांना थांबू देण्यात येत नव्हते. दरम्यान, शनिवारी सकाळी ८.३० वाजता आशा यांचा मुलगा अजय याला इस्पितळातून फोन आला. तुमच्याकडील रुग्णाचा मृत्यू झाल्याचे समोरच्या व्यक्तीने सांगितले. ही बातमी ऐकताच अजय आणि काही नातेवाईक इस्पितळात पोहोचले. तिथे त्यांना रुग्णाचे मृत्यू प्रमाणपत्र सोपविण्यात आले. मृतकाची ओळख पटविण्याकरीता शरीरावरील दागिने दाखविण्यात आले. ते पाहताच दागिनी आई आशा यांचे नसल्याचे मुलगा अजयने सांगितले. त्यानुसार अजय यांनी संबंधित डॉक्टरांना मृतकाचा चेहरा दाखविण्याची विनंती केली. मृतकाचा चेहरा पाहताच त्या आशा मून नसल्याचे स्पष्ट झाले. लागलीच कोव्हिड वॉर्डमध्ये जाऊन पाहिले असता आशा मून या जीवंत असल्याचे दिसून आले. हा संपूर्ण प्रकार मून कुटुंबीयांसाठी धक्कादायक आणि तितकाच संतापजनक होता. या प्रकरणी कुटुंबीयांनी पोलिसांत तक्रार देत इस्पितळाच्या हलगर्जीपणाबाबत योग्य कारवाईची मागणी केली आहे. हा संपूर्ण प्रकार झाल्यानंतर मून यांना छत्रपती चौकातील न्युक्लिअस हॉस्पिटलला हलविण्यात आले.

इस्पितळातील कर्मचारी वर्गाकडून फाइल आणण्यात चूक झाली. रामटेके यांच्याऐवजी मून यांची फाइल आणून रिसेप्शन काउंटरला ठेवण्यात आली. त्यानुसार मृत्यू प्रमाणपत्र बनवून ठेवले. मात्र, मृत्यू प्रमाणपत्र सुपूर्द करण्यापूर्वी कुटुंबीयांना मृतदेह दाखविण्यात आला.

# रात्री उशिरापर्यंत चॅटिंग करणाऱ्या नवऱ्याला जाब विचारला; पत्नी आणि मुलाला पट्ट्याने मारहाण



पुणे: दररोज रात्री उशिरापर्यंत चॅटिंग करणाऱ्या नवऱ्याला जाब विचारणाऱ्या बायकोला आणि मुलाला त्याने बेदम मारहाण केली. ही घटना पुण्यातील बिबवेवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. या प्रकरणी तिच्या नवऱ्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एका ३४ वर्षीय महिलेने बिबवेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून तिच्या पतीवर (वय ३५) गुन्हा दाखल केला आहे. बिबवेवाडीतील विघ्नहर नगरमध्ये शुक्रवारी रात्री अकराच्या सुमारास हा प्रकार घडला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी, त्यांचा नवरा आणि एक मुलगा असे तिघे जण बिबवेवाडीतील विघ्नहर नगर परिसरात राहतात. फिर्यादीचा पती दररोज रात्री कोणाशी तरी चॅटिंग करत असल्याचे त्यांना आढळून आले होते. त्यामुळे ९ एप्रिलला रात्री फिर्यादी यांनी "तुम्ही रोज एवढ्या रात्री रोज सारखे कोणाशी चॅटींग करता? आमच्या सोबत का नाही बोलत?" असे तिने नवऱ्याला विचारले. त्यामुळे तिच्या नवऱ्याला राग आला. त्याने चिडून फिर्यादीला शिवीगाळ करून कंबरेच्या पट्ट्याने, वायरने आणि लाकडी बांबूने मारहाण केली. तसेच, जीवे मारण्याची धमकी दिली.

मुलालाही जीवे मारण्याची धमकी

हा संपूर्ण प्रकार सुरू असताना त्यांचा मुलगा घरातच होता. त्याने भांडणे सोडविण्याचा प्रयत्न केला असता, आरोपीने मुलालाही मारहाण केली. तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी बिबवेवाडी पोलीस पुढील तपास करत आहेत.

गर्लफ्रेंडसोबत राहायला मिळावे म्हणून बायकोला त्रास?

आरोपीचे लग्न झालेले असतानाही त्याला एक गर्लफ्रेंड आहे, अशी माहिती पोलिसांनी फिर्यादिकडे केलेल्या चौकशीतून स्पष्ट झाली आहे. गर्लफ्रेंडसोबत राहायला मिळावे, म्हणून तो बायको आणि मुलाला त्रास देत असल्याचे फिर्यादी महिलेने सांगितल्याचे तपास अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक किरण देशमुख यांनी सांगितले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्कः-9594418181 / 8424989898